MGT

महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत सन २००८-२००९ मधील तंटामुक्त गांव पुरस्कारासाठी पात्र गावे जाहिर करणेबाबत . . .

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

शासन निर्णय क्र.तंमुगा.१००९/प्र.क्र.५८/२००९/पोल-१५,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक: १९ जानेवारी, २०११.

वाचा:- १) शासन निर्णय गृह विभाग क्र.तंमुगा१००८/सीआर-४३/२००८/पोल-१५,
दिनांक १४ ऑगस्ट, २००८.

२) शासन निर्णय गृह विभाग क्र.तंमुगा१००९/सीआर-४९/२००९/पोल-१५,
दिनांक ९ ऑगस्ट, २००९.

३) शासन निर्णय गृह विभाग क्र.तंमुगा१००९/५२८/प्र.क्र.५२/२००९/पोल-१५,
दिनांक १६ फेब्रुवारी, २०१०.

४) शासन निर्णय गृह विभाग क्र.तंमुगा१००९/४४७/प्र.क्र.४५/२००९/पोल-१५,
दिनांक १८ फेब्रुवारी, २०१०.

५) शासन निर्णय गृह विभाग क्र.तंमुगा१००९/प्र.क्र.४९/२००९/पोल-१५,
दिनांक ३० मार्च, २०१०.

शासन निर्णय :- महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिम सन २००८-२००९ मधील तंटामुक्त गाव पुरस्कारासाठी
पात्र ठरलेल्या गावांची घोषणा संदर्भीत (२) येथील दिनांक ९/८/२००९ च्या आदेशान्वये करण्यात आली आहे.
त्यानुसार राज्यातील २८२९ गावे तंटामुक्त गाव पुरस्कारासाठी पात्र ठरली असून त्यातील २६३ गावे शांतता
पुरस्कारासाठी "तंटामुक्त गाव" म्हणून घोषित करण्यात आली आहेत. तद्नंतर संदर्भाधिन दि. १६/२/२०१०,
दि. १८/२/२०१० व दि. ३०/३/२०१० च्या आदेशाने त्यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. त्यानुसार तंटामुक्त
गाव पुरस्कारासाठी पात्र गावांची संख्या २८९० व विशेष शांतता पुरस्कार पात्र गावे २६५ इतकी झाली आहे.

मौजे तोरनाळा, ता. जि. वाशिम हे गाव पुरस्कारास पात्र न ठरल्यामुळे या गावाच्या कामगिरीचे
पुनर्मुल्यांकन करण्याची विनंती शासनास करण्यात आली होती. त्यानुसार या गावाचे पुनर्मुल्यांकन करण्याबाबत
शासनाने निर्देश दिले होते. जिल्हाधिकारी, वाशिम व पोलीस अधीक्षक, वाशिम यांनी त्यांचे पत्र
क्रमांक-तंटामुक्ती कक्ष/फे.मु.अहवाल/मौजे तोरनाळा/१८६/२०१०, दिनांक १५/३/२०१० अन्वये सादर केलेल्या
अहवालानुसार मौजे तोरनाळा हे गाव १५२ गुण मिळवून पुरस्कारासाठी पात्र ठरले आहे. तोरनाळा या गावाची
लोकसंख्या १८३० इतकी असून लोकसंख्येच्या प्रमाणात या गावाला रुपये २,००,०००/- (रुपये दोन लाख
फक्त) इतका पुरस्कार मंजूर करण्यात येत आहे. यामुळे राज्यातील तंटामुक्त गाव पुरस्कार पात्र गावांची संख्या १
ने वाढून ही संख्या २८९० वरुन २८९१ एवढी होईल तसेच विशेष शांतता पुरस्कार पात्र गावे २६५ इतकी राहतील.

३. पुरस्काराच्या रकमेच्या विनियोगाबाबत संदर्भित दि. १४/८/२००८ च्या शासन निर्णयान्वये
देण्यात आलेल्या आदेशानुसार पुरस्कार रकमेचा विनियोग करण्यात येईल.

४. मौजे तोरनाळा या गावाला अनुज्ञेय ठरणाऱ्या पुरस्काराच्या रकमेइतक्या तरतुदीचे वितरण
संबंधित जिल्ह्याला पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे करतील. जिल्हा पोलीस अधीक्षक, वाशिम हे
मौजे तोरनाळा या गावाच्या पुरस्काराच्या रकमेचा धनादेश तयार करतील आणि त्याचे वितरण करतील. सदर
खर्च दि.३१/३/२०११ पूर्वी खर्ची पडणे आवश्यक राहील.
महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहिमेअंतर्गत गाव पुरस्कारासाठी होणारा खर्च रु. २,००,०००/-
(रुपये दोन लाख फक्त) मागणी क्रमांक - बी - १ , प्रधान लेखाशीर्ष - २०५५ पोलीस, (००)(१०) तंटामुक्त

जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम
आवक-
DC
5012
- 3 FEB 2011
03/02/11
वितरण नं.:-

गाव मोहिम (२०५५-०५३ ३), ३१ सहायक अनुदाने याखालील चालू वित्तीय वर्ष सन २०१०-२०११ च्या मंजूर तरतुदीतून करण्यात यावा. या खर्चास प्रस्तुत शासन आदेशान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

६. सदर प्रयोजनार्थ काढावयाचे देयक हे महाराष्ट्र कोषागार नियम नमुना क्र. ४४ मध्ये सादर करुन यासाठी लागणारी रक्कम आहरित करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वि. फ. वसावे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई
महालेखापाल-१ (ले व अ/लेखापरिक्षा) महाराष्ट्र,मुंबई.
महालेखापाल-२ नागपूर ,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व पोलीस अधीक्षक,
अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई,
निवासी लेखा परीक्षा, अधिकारी,मुंबई,
जिल्हा कोषागार अधिकारी, वाशिम,
वित्त विभाग (व्यय-७/ अर्थ-१०) मंत्रालय,मुंबई,
निवडनस्ती, पोल१५

---

## परिशिष्ट - "अ"

(शासन निर्णय क्रमांक- तंमुगा१००९/प्र.क्र.१८/२००९/पोल-१५, दि. १९/१/२०११.)

| अ. क्र. | जिल्हयाचे नाव | तालुका | पोलीस ठाणे | गावाचे नाव | लोक संख्या | तं.मु.गा.पुरस्कारासाठी पात्र | विशेष शांतता पुरस्कारासाठी पात्र | पारितोषिकाची रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वाशिम | वाशिम | जउळका | तोरनाळा | १,८३० | पात्र | निरंक | २,००,०००/- |
| | | | | | | | (एकूण- रुपये | दोन लाख फक्त) |

( वि. फ. वसावे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.